सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/2856
दिनांक 22 OCT 2026

प्रति,
प्राचार्य,

तंत्रशिक्षण संचालनालयाचे अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्था,
अमरावती विभाग, अमरावती व
अभिमत विद्यापीठ,अमरावती विभाग अमरावती.

**विषय : मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतच्या दि.०५.०६.२०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत तसेच इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत...**

**संदर्भ :** १. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२६(ई-१५५८६०६)/आरक्षण-५, दि.०५.०६.२०२६
२.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/SEBC/२०२६/४७९, दि.०३.०९.२०२६
३.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/मराठा/२०२६/५८७ दि.१९.१०.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्या दिनांक ०५/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांचा लाभ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अनुज्ञेय करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

तथापि, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्र.०३ च्या पत्रान्वये शासन निर्णय, दि.०५/०६/२०२६ अन्वये घेतलेल्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत तसेच **इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षण शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत तसेच सदर शिक्षण शुल्क न भरल्यामुळे प्रवेश प्रक्रियेस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधित विभागांनी आपल्या अधिनस्त शिक्षण संस्था / महाविद्यालये यांना आवश्यक त्या सुचना/निर्देश देण्याबाबत** तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शिक्षण संस्था/महाविद्यालये यांच्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहेत.

तरी, सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाचे अखत्यारित सर्व संस्थानी संदर्भिय शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

(डॉ.ए.बी.बोराडे)
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत : मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.(कार्यासन क्र.१८)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल § desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/मराठा/२०२६/५८८७
दिनांक :- 19 OCT 2026

प्रति,

१.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती व नागपूर.

२.कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

३. कुलसचिव,
सी.ओ.ई.पी.तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

विषय: मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतच्या दि.०५.०६.२०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत तसेच इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत..

संदर्भ : १)सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२९(ई-१५५८६०६) /आरक्षण-५, दि.०५-०६-२०२६
२) या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/SEBC/२०२६/४७९, दि.०३/०९/२०२६
३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.७४/मआक, दि.१५/१०/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्या दिनांक ०५/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांचा लाभ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अनुज्ञेय करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार आपल्या विभागातील सर्व महाविद्यालय यांना सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत आपल्यास्तरावरुन कळविणेबाबत तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करणेबाबत संदर्भ क्रमांक ०२ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले आहे. सदर पत्राची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडत आहे.

तथापि, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्रमांक ०३ च्या पत्रान्वये ,शासन निर्णय, दि. ०५/०६/२०२६ अन्वये घेतलेल्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत तसेच इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षण शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत तसेच सदर शिक्षण शुल्क न भरल्यामुळे प्रवेश प्रक्रियेस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधित विभागांनी आपल्या अधिनस्त शिक्षण संस्था/महाविद्यालये यांना आवश्यक त्या सुचना/निर्देश देण्याबाबत तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी न करणा-या शिक्षण संस्था/महाविद्यालये यांच्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात्ता आलेले आहेत.

तरी, सदर पत्राच्या अनुषंगाने,आपल्या विभागातील सर्व महाविद्यालये यांना संदर्भीय शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत आपल्या स्तरावरुन पुनश्च: कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालनालयास सादर करावा.

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत- मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.
(लक्षवेध : श्री अनिल चौरे, कक्ष अधिकारी, तांशि-४)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल-desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/SEBC/२०२६/४७९
दिनांक :- ०३-०९-२०२६

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती व नागपूर,

२. कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड,

३. कुलसचिव,
सी. ओ. ई. पी. तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.

विषय: मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत..

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२१ (ई-१५५८६०६)/आरक्षण-५, दि.०५-०६-२०२६.
२, शासन निर्णय बहुजन कल्याण विभाग क्र. शिवत्ती २०१८/ प्र. क्र. २४२/शिक्षण दि. २६.०२.२०२०

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भीय शासन निर्णय क्र. १अन्वये मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधांचा लाभ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अनुज्ञेय करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व महाविद्यालये यांना संदर्भिय शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. प्रमोद नाईक)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.
(लक्षवेध : श्री अनिल चौरे, कक्ष अधिकारी, तांशि-४)